पुणे पोलीस

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३४१९ दि. १५/११/२०१९**

**मार्केटयार्ड पोलीस स्टेशन,पुणे शहर**

**मार्केटयार्ड बाजारातील व्यापा-याचे अपहरण करुन त्याचेकडून दीड कोटीची रोख रक्कम खंडणी उकळणारे आरोपींना पुणे शहर पोलीसांचे परिमंडळ ५ व गुन्हेशाखेकडील पोलीसांनी केले अवघ्या १२ तासांचे आत केले जेरबंद करुन रक्कम केली हस्तगत**

काल दि.१४/११/२०१९ रोजी रात्रौ २१.४५ वा.चे सुमांरास तळेनगर सोसायटी समोरील गंगाधाम रोडवरील सरकारी गोडावून जवळून अनोळखी तिन इसमांनी इसम नामेः-कांतीलाल गणात्रा वय ६५ वर्षे रा.सिटी पार्क सोसा,,मार्केटयार्ड पुणे हे दुकान आवरुन रहाते घरी परत जात आपले दुचाकी मोटार सायकलवरुन जात असतांना त्यांना जबरदस्तीन एका काळे रंगाचे चार चाकी वाहनांमध्ये जबरदस्तीने बसवून त्यांचे अपहरण करुन त्यांचे मुलगा नामेः- महेश कांतीलाल गणात्रा यांस अपरहण इसमांस जिवे ठार मारणेची धमकी देवून त्यांचेकडून एकूण ०२ कोटी रोख रक्कमेची मागणी केलेने वरुन मार्केटयार्ड पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नं.२०३/२०१९ भा.दं.वि.क.३६३,३६४-अ,३८६,३८७,३४ प्रमाणे गुन्हा नोंद करणेत आलेला आहे.

तसेच सदर गुन्हयांची माहिती मिळालेले व एका ज्येष्ठ नागरिक असलेले व्यापा-यांचे अपहरण झालेने सदर घटनांस्थळी सदर विभागांतील परिमंडळ-५ चे पोलीस उप-आयुक्त,श्री.सुहास बावचे व सहा.पोलीस आयुक्त साो.सुनिल कलगुटकर व अपर पोलीस आयुक्त साो.श्री.सुनिल फुलारी व गुन्हेशाखेकडील अपर पोलीस आयुक्त साो. श्री.अशोक मोराळे,व मा.पोलीस उप-आयुक्त,साो.श्री. संभाजी कदम व मा.सहा.पोलीस आयुक्त साो.प्रतिबंध विभाग,गुन्हे,पुणे शहर श्री.शिवाजी पवार व मा.सहा.पोलीस आयुक्त साो.प्रोसिक्युशन विभाग,गुन्हे पुणे शहर श्री.विजय चौधरी असे सर्व पोलीस अधिकारी यांनी घटनांस्थळी भेट देवून सदर प्रकरणांचे गांभीर्य लक्षांत घेवून अपहरण झालेले इसमांची सुटका करणेकामी व आरोपींना जेरबद करणेकामी आप आपले अधिपत्याखालील व परिमंडळ निहाय व गुन्हे शाखेकडील युनिट निहाय कडील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेगवेगळया टिम करुन त्यांना सदर प्रकरणी योग्यतो आदेशपर व मार्गदर्शनपर सुचनां देवून उपलब्ध तंत्रज्ञानांचा वापर करुन वरील अपहरणकर्ते व अपहरण केलेले इसमांची सुटकेसाठी वेगवेगळयां टिमांवर त्यांचेकडील प्रभारी अधिकारी यांना नेमून सदरबाबत शोध घेणेत आलेला होता.त्याच दरम्यांन अपहरणकर्ते यांनी सदरची खंडणी स्वरुपांतील रोख रक्कम ही चांदनी चौक येथे आणणेबाबत मागणी केलेने त्याप्रमाणे वरील सर्व मा.वरिष्ठांचे मार्गदर्शनाने व स्थानिक पोलीसांचे मदतीने अपहरण केलेले इसमाचे मुलगा याने सदरची रोख रक्कम एकूण दिड कोटी रक्कम घेवून तेथे गेलेले असतांना सदर ठिकाणी सापळा रचणेत आलेला होता व त्याच दरम्यांन अपहरण केलेले इसमांचे जिव वाचविणे ही गरजेचे असलेने त्यानुसार प्रथम अपहरण कर्ते यांचे सांगणेनुसार रक्कम ठेवणेत आलेनंतर सदरची रक्कत घेणेकामी आलेले आरोपींना सदर रक्कम त्यांनी घेतलेनंतर मोटार सायकलस्वारांना ते पसार होत असतांना त्यांचा पाठलाग करुन पकडणेत आलेले आहे.तसेच रक्कम ही त्यांचे इतर साथीदारांनी फॉर्च्युनर या वाहनांतून घेवून पसार झालेले होते.सदर जागीच पकडणेत आलेले आरोपी इसमांनी त्यांची नावे ही अनुक्रमे १) सुजित किरण गुजर,वय २४ वर्षे, रा.मु.पो.उरुळी देवाची,आयबीपी पेट्रोलपंपाचे शेजारी ता.हवेली जि.पुणे २) ओकार श्रीनाथ वाल्हेकर,वय २० वर्षे रा.मु.पो.उरुळी देवाची,वाल्हेकर वस्ती,पाण्याचे टाकी जवळ,ता.हवेली जि.पुणे यांना पकडणेत आलेले होते व त्यांचेकडे केलेले तपासांत त्यांनी सदर अपहरणांचा योजना आखणारा मुख्य सुत्रधार आरोपी इसम नामेः-अजय बाळासाहेब साबळे रा.मु.पो.वडकी नाला,ता.हवेली जि.पुणे व त्यांचा इतर साथीदार नामेः-अमित जगताप रा.

रा.मु.पो. उरुळी देवाची,ता.हवेली जि.पुणे यांनी सदरची खंडणीची रोख रक्कम ही फॉर्च्युनर गाडीतून घेवून गेलेबाबत कबुली दिलेली आहे.

त्यानुसार गुन्हे शाखेकडील युनिट-५ व पोलीस स्टेशनकडील अधिकारी व कर्मचारी यांनी ऊरळीदेवाची व वडकी नाला ही गावे पिंजून काढली असतां त्यांना नामेः-अमित पोपट जगताप,वय २० वर्षे, रा.मु.पो.उरुळी देवाची, आयबीपी पेट्रोलपंपाचे शेजारी ता.हवेली जि.पुणे हा गावांत त्यांनी गुन्हयांत वापरलेली फॉर्च्युनर चार चाकी वाहन व गुन्हयांत खंडणी स्वरुपांत स्विकारलेली रोख रक्कमे पैकी एकूण किं.रु.१,४७,५०,०००/- इतकी रोख रक्कम ही हस्तगत करणेत आलेली आहे.तसेच सदर गुन्हयांत वापरलेली ०१ फोरच्युनर चार चाकी,०१ दुचाकी मोटार सायकल व वरील रोख रक्कम व इतर चिज वस्तू असा अंदाजे एकूण किं.रु.१,७५,२०,०००/-चा मुद्येमाल हा हस्तगत करणेत आलेला आहे.पुढील तपास मार्केटयार्ड पोलीस स्टेशनकडील अधिकारी करीत आहेत.

सदर गुन्हयांची कामगिरी ही मा. पोलीस आयुक्त सो., मा. सहा. पोलीस आयुक्त सो., श्री. रविंद्र शिसवे सर, मा. अपर पोलीस आयुक्त साो.पुर्व विभाग,पुणे शहर श्री.सुनिल फुलारी, मा.अपर पोलीस आयुक्त साो.गुन्हे, पुणे श्री.अशोक मोराळे, मा.पोलीस उप-आयुक्त साो.परिमंडळ-५,श्री.सुहास बावचे, मा.पोलीस उप-आयुक्त,साो.गुन्हे,श्री.संभाजी कदम, सहा.पोलीस आयुक्त साो. वानवडी विभाग,पुणे शहर श्री.सुनिल कलगुटकर व मा.सहा.पोलीस आयुक्त साो.प्रतिबंध विभाग,गुन्हे,पुणे शहर श्री.शिवाजी पवार,मा.सहा.पोलीस आयुक्त साो.प्रोसिक्युशन विभाग,गुन्हे पुणे शहर श्री.विजय चौधरी, मार्केटयार्ड पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी व तपास पथकांतील अधिकारी व कर्मचारीसह,परिमंडळ-५ मधील हडपसर, मुंढवा, वानवडी, कोंढवा, बिबवेवाडी अशा पोलीस ठाणेकडील तपास पथकांतील अधिकारी व कर्मचारी, व गुन्हे शाखेकडील अं.प.वि.प. व खंडणी पश्चिमचे प्रभारी अधिकारी श्री.राजेंद्र मोहिते आणि अधिकारी व कर्मचारी व अं.प.वि.प. व खंडणी पुर्वचे प्रभारी अधिकारी श्री.विजय टिकोळे आणि अधिकारी व कर्मचारी व युनिट-५ कडील प्रभारी अधिकारी श्री.दत्ता चव्हाण आणि अधिकारी व कर्मचारी यांनी सदरची कारवाई ही केलेली आहे.

सदरची यशस्वी कारवाई ही परिमंडळ-५, गुन्हे शाखा, तांत्रिक विभाग यांचे सांघीक व समन्वयांने केलेल्या प्रयत्नाचे यश आहे.

